# शिक्षण हीच यशाची खरी गुरुकिल्ली

## कृष्णा पालयेकर : मधलावाडा पार्से येथील सरकारी प्राथमिक विद्यालयाचे बक्षीस वितरण

*टीम दैनिक हेराल्ड*



पेडणे : विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत प्रमुख पाहुणे कृष्णा पालयेकर. सोबत पार्से सरपंच अजय कळंगुटकर, पंच रेश्मा कांबळी, मुख्याध्यापिका सूचीमा तारी, प्रसाद कांबळी, शिक्षिका तनिष्का खर्बे, मनीषा कांबळी व इतर.

**पेडणे, दि. २८ :** विद्यार्थ्यांनी आपली स्वप्ने मोठी ठेवली पाहिजेत. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी केवळ मोठी स्वप्ने पुरेशी नाहीत, तर त्या स्वप्नांसाठी कठोर परिश्रमही गरजेचे आहेत. शिक्षण हेच असे साधन आहे जे तुम्हाला तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचवते. शिकताना कधीही शॉर्टकट शोधू नका, प्रत्येक दिवस शिकण्यासाठी नवी संधी घेऊन येतो, ती स्वीकारा. परिश्रमाला कधीच पर्याय नसतो, शिक्षण हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन नवचेतना युवक संघाचे अध्यक्ष कृष्णा पालयेकर यांनी केले.

सरकारी प्राथमिक विद्यालय मधलावाडा पार्से येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे या नात्याने श्री. पालयेकर बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत पार्से पंचायतीचे सरपंच अजय कळंगुटकर, स्थानिक पंच रेश्मा कांबळी, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सूचिमा तारी, शालेय व्यवस्था समितीचे प्रमुख प्रसाद कांबळी, शारदोत्सव समितीचे प्रमुख विलास कांबळी, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष मनिषा कांबळी, ग्रीष्मा कानोळकर आदी उपस्थित होते.

सरपंच अजय कळंगुटकर म्हणाले की, गावच्या सरकारी प्राथमिक शाळा टिकल्या पाहिजेत, कारण त्या समाजाच्या प्रगतीची खरी पायाभरणी करतात. या शाळांमध्ये शिकलेल्या विद्यार्थ्यांनी आज विविध क्षेत्रांत नाव कमावले आहे. आपण सर्वांनी मिळून या शाळेच्या विकासासाठी सहकार्य करायला हवे. पालकांना आपल्या मुलांना सरकारी शाळांमध्ये दाखल करून त्यांना दर्जेदार शिक्षण द्या.

याप्रसंगी वरद कांबळी, सौम्या कलंगुटकर या विद्यार्थ्यांचा प्रज्ञाशोध परीक्षेत भरीव यश संपादन केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, गीते आणि भाषणे सादर करत आपली कला सादर केली. विविध शालेय स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापिका सूचीमा तारी यांनी स्वागत व प्रास्ताविक करून शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला. प्रिती शेट कोरगावकर यांनी मान्यवरांचा परिचय केला. सूत्रसंचालन शिक्षिका तनिष्का खर्बे व वैभवी जोशी यांनी केले तर स्मिता बगळी यांनी आभार मानले.

पान १ वरून

### विद्यमान भाजप सरकार कामगारविरोधी

कामगारांना काश्मीरमध्ये पाठवत आहेत.

फोन्सेका पुढे म्हणाले की, औषध कंपन्यांमधील कामगार विविध समस्यांना तोंड देत आहेत. सरकारने पुन्हा एकदा एस्मा सहा महिने वाढवला आहे. आम्ही याला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे आणि त्यावर निर्णयाची प्रतीक्षा करत आहोत.

आयटक गोवाचे आरोप आहेत की, राज्य सरकारने कामगारांच्या समस्यांवर कोणतीही ठोस कारवाई केली नाही. पंचायती, गोवा डेअरी, पूर्व–प्राथमिक मदतनीस, पीडब्ल्यूडी कामगार, पुरवठा संस्था, अंगणवाडी मदतनीस आणि शिक्षक यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आलेले नाही. सरकारला एक आदर्श नियोक्ता म्हणून काम करावयाचे आहे, पण ते तसे करत नाही.

राज्यभरात कामगारांच्या निषेधाच्या घटना घडत आहेत. जर सरकार सहानुभूतीपूर्ण आणि खरे विकास कार्य करत असेल, तर अशी परिस्थिती उद्भवली नसती, असे फोन्सेका यांनी सांगितले. आयटक गोवाने शहरातील कदंब बस स्टँडपासून क्रांती सर्कल पर्यंत रॅली काढण्याची घोषणा केली आहे. रॅली नंतर म्युनिसिपल गार्डनमध्ये जाहीर सभा घेण्यात येईल, अशी माहिती फोन्सेका यांनी दिली.

# बांदा सटमठ येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**टीम दैनिक हेराल्ड**

बांदा, दि. २८ : मुंबई गोवा महामार्गावर सटमटवाडी येथे अज्ञात वाहनाने पाठीमागून धडक देऊन तब्बल १०० मीटर फरफटत नेल्याने दुचाकीस्वार सेवानिवृत्त एसटी बसचालक उत्तम दत्ताराम पडवळ (वय ७१, रा. डेगवे–बाजारवाडी) यांचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात रविवारी दुपारी घडला. बांदा पोलिसात अज्ञात चालकाविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, महामार्गावर सटमटवाडी येथे बॉक्सवेलचे काम सुरु आहे. हे घटनास्थळ अपघातस्थळ असून याठिकाणी आतापर्यंत अनेकांना अपघातात आपला जीव गमवावा लागला आहे. उत्तम हे गोव्यात कामानिमित्त गेले होते. आपल्या ताब्यातील दुचाकी (एमएच ०७ यु ८२१९) घेऊन ते गोव्यातून बांद्याच्या दिशेने येत होते. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दुचाकीला भरधाव वेगात पाठीमागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या दुचाकीला ठोकर दिलेल्या अज्ञात वाहनाने तब्बल १०० मिटर फरफटत नेले. यामध्ये त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. दुपारची वेळ असल्याने वाहतुकीची वर्दळ कमी होती. त्यामुळे कुठल्या वाहनाने दुचाकीला ठोकर दिली हे समजू शकले नाही. ठोकर दिल्यानंतर अज्ञात वाहनचालकाने पलायन केले.

अपघातानंतर स्थानिकांनी याठिकाणी धाव घेतली. मात्र उत्तम यांच्या डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. बांदा प्रभारी पोलिस निरीक्षक संजय कातिवाले यांच्यासह बांदा पोलिसांना तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. बांदा प्राथमिक आरोग्य केंद्रात विच्छेदन करून मृतदेह सायंकाळी उशिरा नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्यांच्या पच्छात २ मुलगे, १ मुलगी, भाऊ असा परिवार आहे. त्यांचा भाचा रवीशेखर सदाशिव कुडव यांनी बांदा पोलिसात फिर्याद दिली आहे.बांदा पोलिसात अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून बांदा पोलिस महामार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत आहेत. उत्तम यांना धडक देऊन पलायन केलेला अज्ञात चालक हा बांदा शहराच्या दिशेने गेला असून पोलिस त्यादृष्टीने माहिती घेत आहेत.

**CHANGE IN NAME**

I, **Vitorio Almeida,** S/o of **Manoel Almeida**, spouse name **Maria Augusta Pereira**, resident of House No.1306, Damon East, Raia, Salcete, Goa 403720, would like to change my name from **Victor Almeida** to **Vitorio Almeida**. Hereinafter in all my future dealings and documents I will be known as **Vitorio Almeida**

Sd/-
**Vitorio Almeida**

**CHANGE OF NAME**

I, **MELINO JORGE FRANCISCO TRAVASSOS,** resident of H NO. 723/1, NESSAI, SANJOSE DE AREAL, SOUTH GOA 403709 would like to change my name from **MELINO JORGE FRANCISCO TRAVASSO** to **MELINO JORGE FRANCISCO TRAVASSOS.** Hereafter in all my dealings & documents, I will be known by my name **MELINO JORGE FRANCISCO TRAVASSOS.**

**CHANGE OF NAME**

I, **Mrs Francisca Aleixinha Fernandes** r/o H.No 327, Poitomado, Cuncolim, South Goa would like to change my name and address on my Indian Passport bearing no P 1993137 from **Francisca Aleixinha Furtado e Fernandes** to **Francisca Aleixinha Fernandes** and my address from Bamonsai, Sanguem, Goa to H. No 327, Poitomado, Cuncolim, South Goa. I also want to change my father's name from **Marino Fernandes** to **Mariano Fernandes**, of my mother from **Piedade Menezes** to **Piedade Rosaria Meneses** and my husband from **Eroi Vincente Furtado** to **Errol Vicente Furtado.** Hereafter in all my dealings and documents, I will be known by the name **Francisca Aleixinha Fernandes.**

Sd/- **Francisca Aleixinha Fernandes**

**CHANGE OF NAME**

I, **CRISTINA ALBUQUERQUE,** resident of FLAT NO. T/4, KAMAT COMPLEX, BLDG A, COLMOROD NAVELIM SALCETE, SOUTH GOA, 403707 would like to change my name from **CRISTINA RODRIGUES** to **CRISTINA ALBUQUERQUE.** Hereafter in all my dealings & documents, I will be known by my name **CRISTINA ALBUQUERQUE.**

**CHANGE OF NAME**

I **AMINABI**, r/o H.NO.757 TISK, USGAO, North Goa, 403406, like to change my name from **AMINA BI ABDUL RAZAK SHAIKH** to **AMINABI** Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **AMINABI.**

# 'आकाश'ची साखळीच्या भारत अॅकडमीशी भागीदारी

**▶ गोव्यातील नीट आणि जेईई विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी विशेष उपक्रम**

*टीम दैनिक हेराल्ड*




**पणजी, दि. २८ :** डॉक्टर आणि अभियंता होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे पाऊल उचलत, भारतातील आघाडीचे टेस्ट प्रिपरेशन संस्थान असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडच्या पणजी शाखेने साखळी येथील भारत अॅकडमीसोबत भागीदारी केली आहे.

या भागीदारीचा उद्देश नीट आणि जेईईच्या तयारीसाठी लक्षित आणि उच्च–गुणवत्तेचे मार्गदर्शन देणे असून, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास सुलभ करून त्यांचे स्वप्न साकार करण्यास मदत करणे आहे. आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड, पणजी शाखा आणि भारत अॅकडमी यांच्यातील हा संयुक्त उपक्रम विद्यार्थ्यांना ११वी नंतर थेट दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची संधी देईल. शालेय अभ्यासक्रमासह वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांची तयारी सुसंगतपणे एकत्रित केली जाईल.

या अभ्यासक्रमात ११वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी नियमित वर्ग दिले जाईल. अत्यंत पात्र व अनुभवी प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण दिले जाईल. विद्यार्थ्यांना प्रभावी शिक्षण पद्धती, दर्जेदार अभ्यास साहित्य, सुरक्षित प्लॅटफॉर्मवर टीटोरियलचे प्री–रेकॉर्डेड व्हिडिओ लेक्चर्स, आठवड्याला सराव चाचण्या व मूल्यमापन यांचा लाभ मिळेल. यामुळे जेईई, नीट आणि ऑलिंपियाडसारख्या राष्ट्रीय स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवणे शक्य होईल.

नीट विद्यार्थ्यांसाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र व प्राणिशास्त्र तर गएए विद्यार्थ्यांसाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांचा सखोल अभ्यासक्रम असणार आहे. संबंधित अभ्यास साहित्य विद्यार्थ्यांना दिले जाईल. उच्च दर्जाची यंत्रणा व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मूलभूत विषयांचे ज्ञान घेणे आणि शिक्षकांशी शंका समाधान करणे अधिक सुलभ होईल. अभ्यासक्रमांसाठी प्रवेश खुले आहेत.

या भागीदारीबाबत आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडचे शैक्षणिक व व्यवसाय प्रमुख डॉ. एच. आर. राव म्हणाले, आमच्या शाळा एकत्रीकरण कार्यक्रमाद्वारे आम्ही विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या पायाभरणीच्या टप्प्यावर सर्वोत्कृष्ट सुविधा देण्याची कटिबद्धता पुन्हा एकदा दृढ करतो. भारत अॅकडमी, साखळी यांच्यासोबतच्या या भागीदारीबद्दल आम्हाला अभिमान आहे. यामुळे शेकडो नवीन विद्यार्थ्यांसाठी शिकण्याचा दर्जा वाढवण्याची संधी उपलब्ध होणार आहे आणि जीवनातील सर्वात महत्त्वाच्या परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी त्यांना मदत होईल.

# सेंद्रिय खताचा वापर करा आयुष्यमान वाढवा : तांबे

**▶ पेडणे तालुका शेतकरी सोसायटीत सेंद्रिय खतांचा वापर वर मार्गदर्शन**

*टीम दैनिक हेराल्ड*



**पेडणे, दि. २८ :** रासायनिक खते ही विषासारखी आहेत. त्याचा वापर टाळून पिकासाठी सेंद्रीय खतांचा वापर करायला हवा, असे प्रतिपादन निनाई अॅग्रो बायोटक कंपनीचे कार्यकारी संचालक सचिन तांबे यांनी केले.

पेडणे तालुका शेतकरी सोसायटीत सेंद्रिय खतांचा वापर या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी पेडणे तालुका शेतकरी सहकारी सोसायटीचे अध्यक्ष विठोबा बगळी, उपाध्यक्ष शांबा सावंत, संचालक सुहास नाईक, रामदास परब, अॅड. अमित सावंत, गजानन कोरगावकर, कार्यकारी संचालक विनायक ठाकूर, निनाई अॅग्रो बायोटक कंपनीचे डॉ. अशोक पुरंदरे, संचालक संजय साळुंके, विक्री अधिकारी देवेंद्र फोंडेकर, कृष्णा मराठे आदी उपस्थित होते.

श्री. तांबे यांनी रासायनिक खताच्या वाढत्या प्रमाणाबाबत चिंता व्यक्त केली. रासायनिक खतांचा वापर वाढल्यामुळे जमिनीचा कस मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहे. त्याचबरोबर रासायनिक खतांचा वापर करून पिकवलेली धान्ये, भाजीपाला, फळे आरोग्यास अपायकारक ठरत आहेत. अशावेळी रासायनिक खातांच्या जागी सेंद्रिय खत्यांचा वापर झाल्यास जमिनीचा कस वाढून दर्जेदार, सकस पिके घेणे शक्य आहे. उत्पादन वाढवणे शक्य आहे त्यासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक खताऐवजी सेंद्रिय खताचा वापर करायला हवा, असे सांगितले

तंत्रज्ञानातून समृद्धी शक्य असल्याचे सांगून त्यांनी आपल्या कंपनीतर्फे तयार करण्यात आलेल्या प्रोटोमिल या सेंद्रिय खताविषयी सचित्र माहिती दिली. भात, नारळ बागायतीसाठी या खताचा वापर केल्यास आपण अपेक्षित पीक घेऊ शकतो. याशिवाय या खताचा वापर केल्याने जमिनीचा नष्ट होत चाललेला कस पुनर्स्थापित करणे शक्य आहे, असे सांगितले. रासायनिक खतावरील खर्च कमी करणारे प्रोटोमिल हे शेणखत व तत्सम सेंद्रिय खतांना उत्तम किफायतशीर पर्याय असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी डॉ अशोक पुरंदरे, संजय साळुंके, देवेंद्र फोंडेकर, कृष्णा मराठे यांनी यावेळी सेंद्रिय खताच्या वापराविषयी मार्गदर्शन केले. पेडणे तालुका शेतकरी सहकारी सोसायटी अध्यक्ष विठोबा बगळी यांनी आभार मानले

**NOTICE UNDER ORDER 5 RULE 20(1-A ) of C.P.C.**
**IN THE COURT OF THE CIVIL JUDGE JUNIOR DIVISION AT PERNEM GOA**

Regular civil suit No. 3/2020

Sakshi Sanjay Kudav & ors., ....Plaintiffs

V/S

Digamber V. Naik & ors., ...Defendants

To,

13. Shubhlaxmi Sawlaram Kandolkar, D/o, Sarojani and Sudan Bhaidkar, 38 years in age, Married,
14. Sawlaram Blhagwan Kandolkar, S/o Bhagwan Kandolkar, 39 years, Both residents of Near Raviraj Bar, Dadhachiwadi, Dhargal, Pernem, Goa.
18. Antonio Fernandes, 85 years in age, Indian National, Resident of Junaswada, Mandrem, Pernem, Goa.
20. Tulshidas Sitaram Naik, Resident of Madhalawada, Arambol, Pernem, Goa-403524.

WHEREAS the above mentioned Applicant has filed Suit for Declaration, Cancellation, Permanent Injunction and Consequential Reliefs.

AND WHEREAS the Notice issued to you on the above last known address which was returned back with an endorsement "Unserved/Party not found", hence notice returned unserved.

And whereas advocate for the applicant has filed an application praying that you be served by substituted service by way of publication and whereas this court is satisfied that this is a fit case for ordering such a service.

Now therefore, notice is hereby given to you under order 5 Rule 20 (1-A) CPC, to appear before this Court on **03rd July, 2025 at 02:30 p.m.** in person or by a pleader to plead in the matter.

Take further notice that in default of your appearance on the day before mentioned the matter will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of this Court, on this 09t day of April, 2025.

SEAL

Sd/- **(Head Clerk)**
By Order of Civil Judge
Junior Division

**IN THE COURT OF MAMLATDAR OF PERNEM TALUKA PERNEM GOA**

**Case No. MAM / PER / MND / 1 / 2022**

1. Mr. Damodar Shankar Gadekar 2. Mrs. Darshana Damodar Gadekar, Both r/o H. No. 357/A, Oxelbag, Dhargal, Pernem, Goa ....Applicants

V/S

1. Mr. Zashwantrao Dessai also known as Mr. Yeshwantrao Dessai 2. Shri Shivaji Zoswantrao Dessai 3. Smt. Ahilya Shivaji Dessai 4. Shri Ramaji Zoswantarao Dessai, All r/o H. No. 90, Arabo, Dhargal, Pernem, Goa 5. Smt. Rupali Balkrishna Prabhu Misquin, C/o Misquin Sorts Shop, near Govekar Bakery, Khorli, Mapusa, Bardez, Goa 403507 6. Mrs. Shraddha Milind Adarkar, R/o 601, Bldg No. 23, Kalpvruksha Garden Co-operative Hsg. Society, Dhokali Road, Yashawinagar, opp. Highland Residency, Thane (West) 400607 7. Mrs. Sweta Mandar Bedekar, R/o B 3/301, Rutu Estate, Patlipada, Near Commissioner Bunglow, Sandozbaug Thane (West) 400607 8. Smt. Supriya Ramji Dessai, R/o H. No. 90. Arabo, Dhargal, Pernem, Goa 9. Shri Raghunathji Zoswantrao Dessai 10. Shri. Laxmanji Zoswantrao Dessai 11. Smt. Suvarn Laxmanji Dessai, All r/o H. No. 90, Arabo, Dhatgal, Pernem, Goa .....Opponents

To, The opponent No. 1, 4, 7, 8 and 9

**NOTICE UNDER ORDER V RULE 20(1-A) OF CPC 1908**

Whereas the applicants have made an application for declaration of Mundkar under section 8A of Goa Daman and Diu Mundkar (Protection from Eviction) Act 1975 w.r.t. the property surveyed under survey no. 274/9 of Village Dhargal in Pernem Taluka.

And whereas the notices were sent to the opponent No. 1, 4, 7, 8 and 9 by register A.D. has been returned by the postal authorities with remark "Expired, Left & Out of Station"

And whereas the applicant vide his application has submits that the applicant in unable to locate legal heirs / any other alternate address of the opponent No. 1, 4, 7, 8 & 9. The applicant has put in a lot of efforts and has made enquiries in and around the said locality, but is unable to locate legal heirs / any other alternate address of the said opponents, therefore they prayed to serve the above respondents by way of substitute service by publishing notice in the daily newspaper.

And whereas after considering the request of the applicant, I have come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in the local newspaper.

Therefore notice is hereby given under order 20(1-A) to you to appear in this Court on **14/05/2025 at 10.30 a.m.** in person or through duly authorized agent failing which ex-parte order shall be passed and the matter shall be decided in their absence.

Given under my hand and seal of this Court on this 23rd day of April 2025.

Seal

Sd/- **Ranjeet R. Salgaonkar**
Mamlatdar of Pernem Taluka, Pernem, Goa

**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR AND SPECIAL NOTARY (EX-OFFICIO) OF BARDEZ JUDICIAL DIVISION AT MAPUSA, GOA**

**NO. CRSR / BARDEZ / NOT / 976 / 2025 Dated 28/04/2025**

**NOTICE**

Mrs. Malini Sawant , Joint Civil Registrar cum Sub Registrar-II and Special Notary Ex-Officio of Bardez Judicial Division at Mapusa, Goa

In accordance with Sec. 346 (11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012, it is hereby made public that by a Notarial Deed of Succession dated 23/04/2025 drawn by and before me Mrs. Malini Sawant, Joint Civil Registrar Cum Sub Registrar II and Special Notary Ex-Officio Bardez at Mapusa at Page 148 onwards in the Notarial Book No. 889 of this Office the following is recorded:

That on 31.10.2025 expired at Mandovi Clinic Alto Pilerne, Bardez, Goa, Mr. Rauji Raghuvir Salkar expired intestate without any Will or any other disposition of his last wish, leaving behind him, his wife Mrs. Sudha Ravji Salkar alias Sudha Rauji Salkar alias Sudjha Raugi Xete Salcar alias Sudha Ravaji Salkar as his moiety shareholder and his children namely (1) Mrs. Nina Rauji Salkar alias Nina Dattanand Vernekar alias Nina Rawaji Salkar married to Mr. Dattanand Prabhakar Vernekar, (2) Mrs. Shila Rauji Salkar alias Shila Ravindra Kerkar alias Shila Raugi Salkar who married to Mr. Ravindra Chandrakant Kerkar, (3) Mrs. Neeta Rauji Salkar alias Neeta Sachin Lotlikar alias Nita Sachin Lotliker, married to Sachin Suresh Lotlikar, (4) Mrs. Vibha Raoji Salkar alias Vibha Yogesh Palshetkar married to Mr. Yogesh Dyanesh Palshetkar, (5) Mr. Pandurang Rauji Salkar married to Mrs. Soniya Pandurang Salkar and (6) Mrs. Yogita Rauji Salkar alias Yogita Ashish Sawardekar married to Mr. Ashish Sawardekar as legal heirs. That aforesaid heirs are the only legal heirs of the said deceased Rauji Raghuvir Salkar and besides the aforesaid heirs, there is no other person or persons who according the law may concur alongwith them to the estate left by the said deceased person.

Any person having objection to this deed may file in this Office within 30 days from the date of its publication.

Seal

Sd/- **Malini Sawant**
Special Notary (Ex-Officio)
Bardez, Mapusa, Goa

# वाळवंटी नदीचा किनारा चकाचक!

## ग्रामस्थांनी स्वच्छता मोहिमेतून केला कचरा गोळा : मोर्ले, केरी पंचायतींचे सहकार्य

*टीम दैनिक हेराल्ड*





**केरी, दि. २८ :** मोर्ले आणि पेळावदा गावातील ग्रामस्थांनी मोर्ले गावातून वाहणाऱ्या वाळवंटी नदीच्या उभो गुणो, मधले तळप आणि करकार कोंड या किनाऱ्यांवर स्वच्छता मोहीम राबवून मोठ्या प्रमाणावर कचरा गोळा केला. प्लास्टिक, दारूच्या काचेच्या बाटल्या आणि अन्य घाण हटवून नदी परिसर स्वच्छ करण्यात आला. या अभियानात सुमारे ६० स्थानिकांनी तसेच पर्यावरण कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

या वाळवंटी स्वच्छता आणि जागृती अभियानात मोर्लेतील केसरकरवाडा, बागवाडा, तसेच केरी पंचायतीतील पेळावदा आणि धनगरवाडा भागातील युवकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. तसेच या उपक्रमात मोर्ले जैवविविधता समितीचे अध्यक्ष कृष्णा गावस, केरी जैवविविधता समितीचे अध्यक्ष नंदा माजिक, विवेकानंद पर्यावरण जागृती फौजचे विठ्ठल शेळके, वनिता वरक, बाल शिक्षण कार्यकर्ते बाबनी मापारी आणि पर्यावरण कार्यकर्ते गणेश शेटकर, सचिन गावस यांची विशेष उपस्थिती होती. मोहिमेच्या शेवटी मोर्ले ग्रामपंचायतीचे सरपंच अमित शिरोडकर यांनी हजेरी लावून सर्व स्वयंसेवकांचे आभार मानले. या अभियानाला मोर्ले आणि केरी पंचायतींचे सहकार्य लाभले.

### शाळकरी मुलांचा सहभाग

या स्वच्छता अभियानात पेळावदा, बागवाडा आणि धनगरवाडा या भागातील शाळकरी मुलांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांनीही मोठ्या उत्साहाने नदीकिनारी स्वच्छता केली. मुलांच्या या सहभागाबद्दल उपस्थितांनी कौतुकाची थाप दिली. शिक्षक कृष्णा गावस यांनी सांगितले की, या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांमध्ये आपले नदी परिसर स्वच्छ ठेवण्याचे संस्कार बाळगले जात आहेत, असे त्यांनी नमूद केले. यावेळी अभियानाच्या समारोपावेळी नंदा माजिक, विठ्ठल शेळके, बाबनी मापारी, संदीप केसरकर, सचिन गावस, संतोष म्हापसेकर, सुमीक्षा गांवकर, वनिता वरक, नंदू गाड, सुदेश केसरकर, गणेश शेटकर यांनी या कार्याची स्तुती करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. दशरथ मोरजकर यांनी संचालन तर संदेश केसरकर यांनी आभार मानले.

### मोर्लेतील युवकांचा पर्यटकांना मज्जाव

दरम्यान गेल्या काही दिवसांपासून मोर्लेतील नदी काठच्या परिसरातील युवक वाळवंटीच्या उभो गुणो, मधले तळप आणि करकार या ठिकाणी आंघोळीसाठी येणाऱ्या बाहेरील पर्यटकांना आंघोळीसाठी मज्जाव करीत आहे. या ठिकाणी दोघांचा बुडून मृत्यू झाला आहे. त्यामुळे पुन्हा असे प्रकार घडू नयेत तसेच या भागात कचरा समस्या आणि पर्यटकांची दंगामस्ती नको म्हणून येथे येणाऱ्यांना समजावून सांगून पुन्हा पाठवत आहेत. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून येथे नदीकिनारे शांत दिसत आहे. आज झालेल्या या अभियानावेळी आमच्या नदीची सुरक्षा आम्हाला करायला हवी त्यासाठी आम्ही करीत असल्याचे सांगितले.

### नदी किनारी लावले नदीच्या धोक्याचे फलक

दरम्यान स्वच्छता मोहिमेवेळी स्थानिकांनी मोर्लेतील उभो गुणो, मधले तळप आणि करकार या डोहाच्या ठिकाणी आणि या ठिकाणी जाण्याच्या मुख्य रस्त्याशेजारी आंघोळीला बंदी आणि नदीच्या धोक्याचे फलक लावले आहेत. बाहेरील पर्यटकांना याचा अंदाज यावा म्हणून त्यांनी असे केले आहे.

वाळवंटी नदीत आंघोळीवर बंदी

दरम्यान, वाळवंटी नदीच्या डोहात बाहेरील पर्यटक आंघोळी करण्यासाठी येतात आणि तेथे गोंधळ घालतात. त्यातील अनेकांना पोहता येत नसल्यामुळे यापूर्वी दोन दुर्दैवी मृत्यू घडले आहेत. अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून स्थानिक ग्रामस्थांनी डोहात आंघोळीवर बंदी घालण्याची मागणी केली होती.

यासंदर्भात केरी आणि मोर्ले ग्रामपंचायती तसेच वाळपई मामलेदार व उपजिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले होते. त्यानुसार वाळपई उपजिल्हाधिकाऱ्यांनी डोहात आंघोळीस बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती मोर्ले ग्रामपंचायतीचे सरपंच अमित शिरोडकर यांनी दिली. तसेच सरपंच शिरोडकर यांनी सांगितले की, लवकरच नदीकाठी बंदीचे फलक लावले जाणार असून, या नदीचे स्वच्छता आणि सुरक्षा राखण्यासाठी स्थानिकांनी योगदान द्यावे, असे आवाहन केले आहे.

**VILLAGE PANCHAYAT UGUEM SANGUEM GOA**

Ref: VP/U/SAN/2025-26/ 122 — **E- TENDER NOTICE (E-tendering Mode only)** — Date: - 28/04/2025

The Sarpanch of Village Panchayat Uguem, on behalf of Village Panchayat Uguem Taluka Sanguem - Goa, invites percentage rate tenders from approved and eligible Contractors, registered in appropriate class & categories with Goa State PWD for the following work:-

| Sr. No. | Name of work & location | Estimated Cost put to tender (Excluding GST) (Rs) | Earnest Money Deposit in (Rs) | Cost of Tender in (Rs) | E – tenders processing fees in (Rs) | Class and category of contractor | | Period of completion (in days) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Mode of payment : e payment only | | | As per Old Registration | As per New Registration | |
| 1. | Construction of Community hall at Survey No. 35/12A at V. P. Uguem, Sanguem Goa | 3964405.97 | 79288 | 6000 | 6000 | Class II & Above BLDGS | Class III & Above BLDGS | 120 days |

**NOTE:** Any changes in the tender notice, such as calculation in GST or any other scheduled rates as per GSR/CPWD Manual Should be accepted by all tenders /Bidders before issue of work order.

**TENDER SCHEDULE : 1.** The Last date of online submission of tender is **08/05/2025 up to 16.00. hrs. 2.** The date & time of opening of online tender is **09/05/2025 at 10.30 hrs.** in the Office of the Village Panchayat Uguem, Sanguem- Goa.

The online application should accompany the following documents (Scan and Upload on the e-Tender website

**http://eprocure.goa.gov.in**

Seal

Sd/- ( Smt Divya D. Naik ) Sarpanch, Village Panchayat Uguem